RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 Aug 2014 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 Aug 2014

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : दुसरा | ऑगस्ट २०१४

अमृतवेळ (ध्यानअभ्यासापूर्वी दिलेला संदेश) 4

हे परमात्मा कृपाल! (हृदयस्पर्शी प्रार्थना) 7

सुख-दु:खांची नगरी (सत्संग) 13

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 25

कर्मांची परतफेड (प्रश्नोत्तरे) 26

मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

अमृतवेळ

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी ध्यान-अभ्यासास बसविण्यापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश - १६पी एस राजस्थान - १० ऑक्टोबर १९८१



जेव्हापासून हुजूर कृपालजी हे जग सोडून गेले आहेत, तेव्हापासून मी कोणतेही नवीन भजन लिहिले नाही. मी त्यांच्या समोर भजन रचून गात असे. अनेकदा भजन ऐकता ऐकता हुजुरकृपालजींच्या नेत्रांतून अश्रू ओघळू लागत. मी भजनांमध्ये स्वत:चा उल्लेख 'गरीब अजायब' असा करीत असे, परंतु त्यांनी त्याऐवजी 'दास अजायब' असे लिहिण्यास मला सांगितले.माझ्या हृदयात सतगुरूंप्रती प्रेमाच्या प्रचंड कळा निर्माण होत असत. भजन म्हणण्यापूर्वी मी पूर्वतयारी केली, असे कधीच होत नसे. महाराजजी जे काही माझ्या मुखाद्वारे वदवून घेत असत, तेच मी म्हणत असे. जेव्हा कधी रात्री त्यांच्यासोबत मला झोपण्याची संधी मिळत असे, तेव्हा ते मला विचारीत,''बोल बंधु! तुझ्याकडे काही मसाला (रचलेले भजन) आहे काय?'' त्यावेळी मी म्हणत असे,''उखळही तुमची, मुसळही तुमचीच व मसालादेखील तुमचाच, तो कोठून बाहेरून आणावयाचा आहे?''

महाराज सावन सिंहजींच्या चरणांपाशी बसण्याची मला अनेकदा संधी लाभली. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मला चांगलाच परिचय होता. त्यांची मनमोहक मूर्ती माझ्या हृदयामध्ये कोरली गेली होती. जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्या एखाद्या जिवलग व्यक्तीचे वर्णन करीत असेल, तेव्हा त्यास दुसरे काय हवे असते? त्याच्यासाठी आणखीन दुसरा कोणता सोन्याचा सूर्य

उगवू शकतो? हुजूर कृपाल जेव्हा भजन ऐकत, तेव्हा त्यांच्या नेत्रांद्वारे अश्रू ओघळत असत; ते अत्यंत प्रेमभावाने भजन ऐकत असत. हरबंसला देखील हुजूर कृपालजींसमोर भजन गाण्याची संधी लाभलेली आहे.

मी जेव्हा खूनी चक हे ठिकाण सोडले, तेव्हापर्यंत मी बरीच भजने रचलेली होती. परंतु ती भजने कधी मी सांभाळून ठेवली नाहीत. भजने लिहून घेणारे इतर प्रेमी होते. त्यामुळे जर एखाद्या प्रेमीने भजन लिहून ठेवले असेल तेच भजन उपलब्ध झाले. ही भजने त्या काळची आहेत, ज्याकाळी माझ्या हृदयाचे भान हरपले होते, त्यास केवळ सर्वत्र प्रेमच प्रेम दिसत होते.

परमपिता कृपाल अतिशय महान होते. त्यांनी केवळ आम्हा गरीबांसाठी मनुष्य शरीर धारण केले. शरीराची काही विशेषत: नसते, ते फक्त मलमुत्राने भरलेले पोते असते. परमपिता कृपाल केवळ आम्हा जीवांसाठीच शरीर धारण करून या जगात आले असूनही, आम्ही त्या महान आत्मा, परमपित्याची कदर केली नाही.

मी नेहमी सांगत असतो की, आपण रोज रात्रभर जागून परमात्म्यासमोर रडत राहावे व विनंती करावी की, तू माझ्या अंतर्यात असूनही मला भेटत का नाहीस? माझी काय चूक झाली आहे? व चूक झाली असेल, तर मला माफ कर. मी तर चूका आणि अवगुणांचे भंडार आहे. एखादे मुल पालकांचा हात सुटल्याने गर्दीत हरवते व आई–वडिलांच्या आठवणींनी, त्यांच्या विरहात रडत राहते. मनुष्याने जर स्वत:च्या कर्मांचा आढावा घेतल्यास त्याच्या लक्षात येईल की, तो तर सतगुरूंच्या बाह्यसत्संगाचा लाभ मिळण्या लायकीचा देखील नाही. परंतु आपण सतगुरूंना सांगतो की आम्ही किती सदाचारी व सद्गुणी आहोत. ते इतका ध्यान–अभ्यास करून सचखंडास पोहोचलेले असूनही ते आपणांस मान देतात व म्हणतात की, तू खूप चांगला आहेस, तुज समान दुसरा कोणीही नाही. खरेतर हे सर्व सत्गुरूंचेच मोठेपण आहे.

सावन शाहजी पेशावर येथील एका महिलेचे उदाहरण देत असत. तिचे एकच काम असे, ती गल्लीतील चौकात बसून, गल्लीतून जाणाऱ्या प्रत्येक

पुरुषास उद्देशून म्हणे, ''तू अमुक अमुक स्त्रीकडे जाऊन आला आहेस, तू बदफैली व दूराचारी आहेस.'' त्या गल्लीमधून जेव्हा एखादी स्त्री जात असे, तेव्हा त्या स्त्रीला सुद्धा ती महिला म्हणत असे,''तू अमुक अमुक पुरुषाकडे जाऊन आली आहेस, तूदेखील बदफैली आहेस.'' शेवटी लोकांनी त्या गल्लीमधून जाणेच बंद केले. त्याचप्रमाणे जर सत्‌गुरूदेखील त्यांच्या शिष्यांचे अवगुण पाहात व दर्शवत राहिले, तर एकही शिष्य त्यांच्या संगतीचा फायदा घेऊ शकणार नाही. सत्‌गुरू शिष्यांच्या चुकांवर पांघरूण घालणारे तसेच धीरगंभीर असतात. त्यांच्या अंतरात कमालीची सहनशीलता असते. परंतु आपण मात्र असा विचार करता कामा नये की, आपल्या कृत्यांकडे कोणाचेही लक्ष नाही. काळ व दयाळ या दोन्ही शक्ती आपल्या अंतर्यात आहेत व त्या आपल्यावर लक्ष ठेवून आहेत.

सत्‌गुरू नामदानाच्या वेळी शिष्याच्या अंतर्यामामध्ये स्वत:चे स्थावर आसन ग्रहण करतात. शिष्य जेव्हा एखादे दुष्कृत्य करू लागतो, तेव्हा काळ सत्‌गुरूंना निर्देश करून दाखवित म्हणतो की,''पाहा! तू यास नामदान दिले आहेस. याचे दुष्कृत्य तर तू बघ!'' परंतु सतगुरुंमध्ये अमाप सहनशिलता असते, इतके होऊनही सत्‌गुरू काळास म्हणतात की,''यास त्याची चूक समजून येईल, तो नक्कीच सद्‌गृहस्थ बनेल.''

आत्म्याच्या परमात्म्यास जागृत करणे, हे आपले प्रथम कर्तव्य आहे. आपण रात्री जागून परमात्म्याच्या विरहात तळमळत त्याचे स्मरण करीत त्यास विचारावे की,''तू माझ्या अंतरामध्ये असूनही मला भेटत का नाहीस? माझी काही चूक झाली असल्यास, त्या चुकीची माफी दे. कारण केवळ तूच माफीकर्ता आहेस.'' खरेतर परमात्मा आपणांस सतत हाक मारीत आहे, परंतु ती हाक आपण ऐकणे गरजेचे आहे. आपल्या अंतरात परमात्म्याप्रती प्रचंड तळमळ असली पाहिजे, मग आपल्या अंतरात आपोआपच त्याच्या विरहाची गीते निर्माण होऊ लागतील. बंधुंनो! आता तुम्ही ध्यानास बसा.

***

हे परमात्मा कृपाल!

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी परमपिता परमात्मा कृपालजींपुढे केलेली एक कळकळीची व हृदयस्पर्शी प्रार्थना – मुंबई – ११ जानेवारी १९९६

चलो नीं सईयो सिरसे नूं चलिए,
तांघां सोहणे यार दियां, चलो नीं सइयो सिरसे नूं चलिए,

कर्त्या करवित्या सामर्थ्यवान परमपिता परमात्मारुप सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी आपणांवर अपार कृपा करीत त्यांच्या भक्तीचे दान दिले. आताच रेणू व मोतिया जे भजन गात होत्या, ते भजन त्याकाळी लिहिले गेले होते, जेव्हा महाराज सावन सिंहजींनी सिरसा–सिकंदरपुर गावी शेतीसाठी जमीन खरेदी करून, त्या जमिनीचा तेथेच राहून विकास केला. त्यावेळी ती जागा निर्जन होती, जेथे आता खूप लोकसंख्या आहे.

महाराज सावन सिंहजीचा त्यावेळी कठोर आदेश होता की, ज्या कोणास मला भेटावयाचे आहे, त्याने ब्यास येथील आश्रमातच भेटण्यासाठी यावे, येथे सिरसा गावी येऊ नये, कारण येथे मी एक गृहस्थी जीवन जगत आहे. तुम्हांस कल्पना आहे की, ज्याचे सत्गुरूंशी अंतर्यात मिलन झालेले असते, तो त्यांचे शारीरिक दर्शन न मिळाल्यास किती व्याकुळ होऊन तळमळतो! त्याची जी अवस्था होते, केवळ तोच त्या विरहअग्नीच्या वेदना समजू शकतो. अशा प्रकारचा दुरावा निर्माण करण्यामागेदेखील संतांचे एक मोठे रहस्य असते. ते आपल्या अंतरातील त्यांच्या प्रती असलेल्या प्रेमामध्ये व त्यांच्या भेटीच्या तळमळीमध्ये वृद्धी करू इच्छितात.

त्यावेळी महाराज कृपालजींनी या भजनांनाच संदेशाचे रूप दिले होते. बीबी हरदेवी (ज्या नंतर ताईजी या नावाने प्रसिद्ध झाल्या) या महाराज सावन सिंहजी व महाराज कृपाल सिंहजी यांच्या दरम्यान संदेश पोहोचविण्याचे कार्य करीत असत. ताईजी महाराज सावन सिंहजींकडे जाऊन महाराज कृपालजींच्या कविता (भजने) ऐकवित असत.



आमचा जनरल विक्रम सिंह, महाराज सावन सिंहजींचा अतिशय प्रिय शिष्य होता. मी त्यावेळी ऑपरेटर म्हणून काम करीत असे. मला त्याच्या सोबत महाराज सावन सिंहजींकडे जाण्याची खूप संधी मिळे. ज्यावेळी हे भजन ताईजी महाराज सावनजींना ऐकवीत होत्या, त्यावेळी मी तेथेच उपस्थित होतो. भजन ऐकून माझ्या अंतरात खूप तळमळ व प्रेम उत्पन्न झाले की ह्यांच्या हृदयात सतगुरुंसाठी इतकी तळमळ व प्रेम आहे की ते तर सतगुरूंच्या वहाणांनादेखील स्वत:पेक्षा श्रेष्ठ समजतात! त्यावेळी सतगुरुंप्रती प्रचंड प्रेम व त्यांच्या दर्शनाची तळमळ व्यक्त करणारे हे भजन लिहिणारे भविष्यात माझे गुरु बनतील याची मला कल्पना नव्हती. अशाप्रकारे स्वत:च्या अंतरात सतगुरूंप्रती प्रेम उत्पन्न करीत त्यांनी त्यांच्या सतगुरूंची कृपा प्राप्त केली. आज आपण त्यांच्याच कृपेने येथे एकत्र जमलेलो आहोत. आपण सर्वांनी प्रार्थना करावयास हवी की, **हे परमात्मा कृपाल!** आपण आम्हांस सद्बुद्धी द्यावी की जेणेकरून आम्ही आपण आमच्यावर करीत असलेल्या प्रेमास व कृपेस जाणून घेऊ शकू.

हे परमात्मा कृपाल! माझा या जगातील कोणत्याही रीति–रिवाजावर व कर्मकांडावर विश्वास राहिलेला नाही. पापींना पुण्यवान बनविणारे, पापींना तारणारे, त्यांना अधमस्थानातून उच्चतेकडे नेणारे नाम तुम्ही आम्हांस द्या.

हे परमात्मा कृपाल! मला कल्पना आहे की तुम्हाला तुमचे भक्त अतिशय प्रिय आहेत. तुम्ही आम्हांस भक्तीचे दान द्यावे, ज्यायोगे आम्ही तुमची भक्ती करून तुमचे प्रिय बनू शकू.

हे परमात्मा कृपाल! मला कल्पना आहे की, तुम्ही पापींचे तारणहार आहात. आम्ही अनंत पापं व गुन्हे करून तुमच्या द्वारी आलेलो आहोत, तुम्ही आम्हांस माफ करा. **हे परमात्मा कृपाल!** तुम्ही तारणकर्ते आहात, आम्ही जर अशी पापं–गुन्हे केले नसते, तर तुम्ही कोणास तारले असते? तुम्हांस मग तारणकर्ता असे कोणी संबोधले असते?

हे परमात्मा कृपाल! मी या जगातील माझ्या धनसंपत्तीचा, माझ्या रूपाचा, ध्यान–अभ्यासाचा कसा बरे गर्व करू? माझ्या अगोदर माझ्या सारख्या अनेक सख्या–मैत्रीणी तुमच्या द्वारी उभ्या आहेत. त्या एकापेक्षा एक माझ्याहून श्रेष्ठ आहेत. त्यांच्यासमोर मी अगदी नगण्यच आहे. मी जेव्हा स्वत: केलेल्या गुन्ह्यांकडे पाहतो तेव्हा लज्जेने माझे मस्तक झुकते, परंतु तुम्ही देत असलेल्या माफीकडे पाहून माझे मस्तक पुन्हा ताठ होते, कारण आम्हास तारणकर्ता परमात्मा महान कृपालजींच्या रूपाने लाभला आहे. महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''एखादा गुन्हा करून, तो गुन्हा केलेला मान्य न करणे म्हणजे आपण आणखीन एक गुन्हा करीत असतो.'' आपण जर आपल्या याच जन्मात केलेले गुन्हे बारकाईने मोजले तर लक्षात येते की आपले असंख्य गुन्हे आहेत. आपल्या गतजन्मांमध्ये आपल्या हातून घडलेल्या गुन्ह्यांची किती ओझी घेऊन आपण फिरत आहोत याचे आपणांस ज्ञानही नाही. आपल्या अंतरामध्ये बसून आपले मन रात्रंदिवस कोणास आपला मित्र तर कोणास आपला शत्रू बनवित आहे.

सतगुरूरूपी परमात्मा आपल्यावर कृपा करण्यासाठीच याजगात येतो. आपण त्यांच्यासमोर प्रार्थना करावी की भटकत–भटकत आम्ही तुमच्या द्वारी आलो आहोत, तुम्ही कृपा करून तुमचे भक्तीदान आम्हांस द्यावे.

हे परमात्मा कृपाल! मी तुमचे बाळ असून तुम्ही मातेप्रमाणे तुमच्या कृपेचे दुग्धपान करवून मला मोठे करावे. **हे परमात्मा कृपाल!** मी तुमचे वासरू असून तुम्ही माझी गायरूपी माता आहात; तुम्ही माझ्यापासून तुमचे कृपारूपी दुध लपवू नका. मी तुमच्या द्वारी आलो आहे. मी भुकेलेलो, तहानलेलो असून तुम्ही तुमचे कृपास्वरूपी दुध मला पाजावे.

हे परमात्मा कृपाल! तुम्ही माझी चिमणीरूपी आई असून, मी तुमचे पिल्लू आहे. तुम्ही माझ्या चोचीत तुमच्या अंतरातील शब्दध्वनीरूपी घास भरवा. तुम्ही माझी हरिणस्वरूपी आई असून मी तुमचे पिल्लू आहे. मी तहानलेलो असून तुम्ही मला तुमचे कृपारूपी दुध पाजावे.

हे परमात्मा कृपाल! मी निराश्रित व निराधार असून, तुम्ही माझे रक्षण करा, ज्याप्रमाणे पश्चिमेकडील लोक स्वत:च्या पत्नीच्या पाठीवर हात ठेवतात, त्याप्रमाणे तुम्हीदेखील माझ्या पाठीवर हात ठेवावा.

हे परमात्मा कृपाल! मला खात्री आहे की, तुम्हास भक्ती प्रिय आहे तसेच तुम्हास भक्ती करणारे भक्त देखील प्रिय आहेत. म्हणून रात्रंदिवस माझी तुमच्यापुढे प्रार्थना आहे की तुम्ही माझ्याकडून भक्ती करवून घ्यावी.

परमात्मा कृपालजींच्या कृपेने आपणांस आठ दिवस भक्ती करण्याची संधी लाभली. तुम्ही तुमच्या घरी परतल्यावर स्वत:च्या संसारीक जबाबदाऱ्यांचे पालन करीत, दररोज ध्यान–अभ्यास व नामस्मरण करावे. सत्संग ध्यान–अभ्यासाचे कुंपण असते. जेथे कोठेही प्रेमी, समूह–प्रमुख सत्संग करतात, तेथे सतगुरूंच्या आठवणींचे वातावरण तयार झालेले असते. त्याठिकाणी तुम्ही जरूर जावे. महाराज कृपालजींनी आपणांस दैनंदिनी (डायरी) ठेवण्यास सांगितले आहे. दैनंदिनी ठेवणे म्हणजे आपल्या दररोजच्या जीवनामध्ये आपण किती आध्यात्मिक प्रगती केली? किती गुन्हे केले? यांचा हिशोबाची नोंद ठेवणे होय! पुढील आयुष्यामध्ये गुन्ह्यांप्रती कानांवर हात ठेवावा की **हे परमात्मा कृपाल!** तुम्ही मला माफ करावे. मी अगोदरच अनंत गुन्हे केलेले आहेत, जर मी आणखीन गुन्हे केले, तर मी ध्यान–अभ्यासामध्ये तसेच नामस्मरण करण्यामध्ये कसा बरे यशस्वी होईन?

ज्या प्रेमींनी येथे येऊन तन, मन आणि धनाने सेवा केली, त्या सर्वांचा मी आभारी आहे. जेथे कोठेही सत्संगाचा कार्यक्रम असतो, तेथे पंजाब व राजस्थान येथील प्रेमी खूप सहकार्य करतात, लंगरची खूप सेवा करतात. आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे की, त्यांना सहकार्य देत, ते करीत असलेल्या सेवेचा फायदा करून घेत अधिकाधिक ध्यान–अभ्यास व नामस्मरण करावे.

आपणा सर्वांना कल्पना आहे की येथे प्रत्येक व्यक्ती नि:स्वार्थपणे सेवा करतो, येथे कोणीही पगार घेऊन नोकरी करणारा नाही. आपणदेखील त्यांच्या नम्रतेची व कार्याची कदर करावी. येथून फक्त अन्न खाऊन वा निंदानालस्ती करून आपण जाऊ नये. आपण येथे ध्यान–अभ्यास संग्रहीत करावा, जेणेकरून येथे सेवा करणाऱ्या प्रेमींनादेखील त्यापासून लाभ होईल.

अखेरीस सर्व प्रेमींना त्यांच्या परतीच्या निर्विघ्न प्रवासाची मी शुभेच्छा करतो व अपेक्षितो की येथे संग्रहीत केलेले नामस्मरण आपण घरी जाऊनही सांभाळून ठेवाल व दररोज नामस्मरण कराल.

***

सुख–दु:खांची नगरी

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज,
हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी, अहमदाबाद – ६ सप्टेंबर १९९५

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो,ज्यांनी आपणांस त्यांचे गुणगान करण्याची संधी दिली. परमात्मा प्रिय संत–महात्मे कोणत्याही युगात या पृथ्वी–तलावर आले, तरी त्या सर्वांचा एकच संदेश असतो, तो म्हणजे परमात्म्याची भक्ती करणे. महात्मा येथे ना नवीन धर्म बनविण्यासाठी ना येथे अगोदरच अस्तित्वात असलेला धर्म तोडण्यासाठी येतात. ते आपल्या हातांमध्ये लाठ्या देऊन लढाई करण्याचे शिक्षण देण्यासाठी वा जगास सुखांची नगरी बनविण्यासाठी याजगात येत नाहीत. जर तसे असते तर अनेक थोर संत–महात्मे या जगात येऊन गेले, त्यामुळे आतापर्यंत हे जग सुखांची नगरी व्हावयास हवी होती.

प्रत्येक युगात सुखं–दु:खं, गरीबी–श्रीमंती, सुदृढता–आजारपण, जन्म–मृत्यू अस्तित्वात होते. लढाई, हाणामाऱ्या व युद्धकंदन या जगात सदैव चालू असतात. संत या **सुख–दु:खाच्या नगरी**तून आपली सुटका करण्यासाठी याजगात येतात. संत आपणांस समजावतात की येथे आपणांस दिसत असलेली सुखं तात्पुरती आहेत. या सुखांचे रूपांतर दु:खांमध्ये कधी होईल, हे आपणांस सांगता येत नाही. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

सहस्र दान दे इन्द्र रोवाया, परशुराम रोवे घर आया ।
रोवे राम निकाला भया, सीता लक्ष्मण बिछड़ गया ।
देहसर रोवे लंक गँवाए, जिन सीता आंदी डमरू आए ।
रोवे पांडव भये मजूर, जिनका स्वामी रहत हुजूर ।
बाली रोवे नेह पुकार, नानक दुखिया सब संसार ।।

गुरू नानकदेवजी आपणांस एका सुरेख नकाशाप्रमाणे जगाचे सत्य आपल्यासमोर मांडून समजावतात की या जगामध्ये जे कोणी पीर–पैगंबर,

ब्रह्माचे अवतार आले, ते देखील येथून जाताना रूदन करीतच गेले. महात्मा या **सुख-दु:खाच्या नगरात** येऊन आपणांस 'शब्द-नामाचा', प्रेमाचा संदेश देतात. आपण नेहमीच म्हणतो की मनास मोकळे सोडावे, कोणतीही इच्छा दाबून ठेवू नये, आपल्या सर्व इच्छांची पूर्ती करावी. परंतु संत सांगतात, आपण जर आपल्या मनास इच्छापूर्तीमागे भरकटण्यासाठी मोकाट सोडले तर असे भरकटलेले मन आपली वाताहात करून टाकते.

प्रियजनहो! आपण अग्नी विझविण्याच्या हेतूने त्यावर जितकी लाकडे, तूप वा तेल टाकू, तेवढा तो अग्नी अधिकच प्रज्वलित होतो. परंतु त्याच प्रज्वलित अग्निवर पाणी टाकल्यास, तो त्वरीत शांत होतो. याप्रमाणे आपले मन या जगातील विषय-विकार व मौजमस्तीत अगोदरच भरकटलेले आहे. आपण जर या मनास आणखीन भरकटण्याची परवानगी दिल्यास आयुष्यभर मन:स्तापाशिवाय दुसरे काही आपल्या हाती लागणार नाही.

आपण एखाद्या भिकाऱ्याकडे असलेली नाणी जरी हिसकावून घेण्याचा प्रयत्न केल्यास, तो ती देण्यास तयार होणार नाही. परंतु त्यास आपण जर त्याच्या जवळ असलेल्या चिल्लरहून अधिक मूल्याचे सोन-चांदी वा डॉलर दिल्यास, त्यास समजावण्याची गरजच पडणार नाही. तो त्याची चिल्लर असलेली मुठ आपणांसमोर आपोआपच मोकळी करेल.

संत आपल्यासाठी अशा एका देशाचे महात्म्य वर्णन करणारा संदेश देण्यासाठी येतात, जो अजरामर देश आहे. तेथे जन्म-मृत्यू, विषय-विकार यांचा अग्नी नाही, जेथे दु:ख वा कोणी दुखावणारा नाही. संत महात्मा सांगतात की आपण तेथे केवळ विद्यार्जन करून वा रीती-रिवाज करून पोहचू शकत नाही. या जगात आपणांस फसवणारी जर कोणती शक्ती असेल, तर ते आपले मन आहे, जे आपल्या अंतरात आहे. त्या मनास त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचवण्याचा मार्गच संत आपणांस सांगत असतात. आपला आत्मा सत्पुरुषाचा अंश आहे तर मन ब्रह्म देशाचा अंश आहे. मन आणि आत्मा दोघेही आपल्या अंतरातच आहेत.

संत आपणांस प्रेमाने समजावतात की, आपण नामस्मरण करत, या जगात विखूरलेले आपले ध्यान (लक्ष) शरीराच्या नऊ द्वारांपासून हटवून, आपल्या दोन्ही नेत्रांच्या मागील बाजूस एकाग्र करावयाचे आहे व त्याद्वारे आपल्या मनास त्याच्या मुक्कामी म्हणजेच ब्रह्मस्थानात पोहोचवणे गरजेचे आहे. तेव्हाच आपला आत्मा मनाच्या तावडीतून मुक्त होतो. त्यानंतर आपला आत्मा, पवित्र ध्वनी वा तेज असलेल्या ठिकाणी पोहोचतो. तेथे पोहोचल्यावरच आत्म्यास ज्ञान होते की मनाच्या नादी लागून मी नीच योनींमध्ये फिरत होतो, तसेच विषय-विकारांमध्ये गुरफटलेलो होतो, ही माझी चूक होती. यास आपण आत्मा व मनाची गाठ सुटणे वा मनास त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचविणे असे म्हणून शकता.

संत-महात्मे सांगतात की, ही साधना करण्यासाठी आपणांस आपले घर-दार, मुले-बाळे त्यागण्याची गरज नाही, आपला देश त्यागण्याची वा शरीरावर कोणत्याही विशेष प्रकारची वस्त्रे परिधान करण्याची गरज नाही. आपण आपापल्या समाजात राहावे, आपापल्या समाजा व प्रदेशानुसार वस्त्रे परिधान करावीत, परंतु साधना करीत अंतर्यात जाताना विरोधी शक्तींपासून मात्र स्वत:चा बचाव करावा.

संत-महात्मे आपणांस प्रेमाने समजावतात की आपण या संसारास, **सुख-दु:खांच्या नगरास** कशारितीने त्यागावे? आपण मृत्यूस विसरलेलो आहोत. आपण असा विचार करतो की, आपणांस कोठे शरीर त्यागणार आहोत? या जगातील भोग-विलास, मौज-मस्ती आपल्यासाठीच आहेत. परंतु परमात्म्याचे प्रिय संत-महात्मे आपणांस इशारा देतात की जी धन-संपत्ती आपल्या दृष्टीस पडत आहे, ती संपत्ती या अगोदर आपल्या पूर्वजांच्या ताब्यात होती. ते देखील या संपत्तीवर अतोनात प्रेम करीत असत. परंतु ते जर तिला त्यांच्या सोबत नेऊ शकले नाहीत, तर काय आपण ही धन-संपत्ती मृत्युसमयी आपल्या सोबत घेऊन जाऊ शकू?

तुमच्या समोर स्वामीजी महाराजजींची वाणी सादर केली जात आहे. ते आपणांस प्रेमाने समजावतात की आपण आपल्या पूर्वकर्मांच्या हिशोबांची परतफेड करण्यासाठी या जगात आलेलो आहोत. आपण सत्कर्मे केलेली असतील तर आपला जन्म श्रीमंत व सुखसोयीसंपन्न घरांमध्ये होतो, आपणांस सुबुद्धीची प्राप्ती होते, जास्तीतजास्त आपण स्वर्ग-वैकुंठामध्ये जातो. आपणांस जगाची मिळालेली सत्ता, हे देखील आपल्या सत्कर्माचे फळच आहे. सत्कर्मांमुळे झोपडीतून उठून आपण महालामध्ये राहू लागतो, झाडू मारण्याचे करीत असलेले काम जाऊन आपल्या हाती सत्ता येते.आपण सत्ताधिशांचा थाटमाट पाहातो की जनता त्यांची मिरवणूक काढते, त्यांच्या गळ्यात फुलांचा हार घालून सत्कार करते. त्यावेळी त्यांचा आनंद गगनात मावेनासा होतो. ते विचार करू लागतात, ही सत्ता त्यांच्याकडे कायम राहणार आहे. परंतु आपला अनुभव सांगतो, रेडिओमध्ये ऐकावयास मिळते, वर्तमानपत्रामध्ये वाचावयास मिळते की एका रात्रीमध्ये सत्तापालट होतो. दुसऱ्या पक्षाचे बल वाढते. डोक्यावर घेऊन मिरवणूक काढणारी मंडळीच त्यांना गोळ्या घालून ठार मारतात. आपण कुकर्मे केलेली असतील तर आपल्यासाठी नरक तसेच चौऱ्यांशी लक्ष योनींचा फेरा तयारच असतो.

तजो मन यह दुख सुख का धाम, लगो तुम चढ़ कर अब सतनाम ।

स्वामीजी महाराज प्रेमाने सांगत आहेत, तुम्ही केवळ ध्यान व नामस्मरण केल्याने या **सुख-दु:खाच्या नगरीतून** पार होऊ शकाल. तुमचे खरे घर सतनाम असून तुमचा आत्मा त्या सतमानाचे अपत्य आहे. जोपर्यंत आपण आपल्या आत्म्याची मनाच्या तावडीतून सुटका करून घेत नाही, तोपर्यंत आपण आपल्या खऱ्या घरी परत जाऊ शकत नाही. संतांच्या संगतीत गेल्यावर आपणांस यागोष्टीचे आकलन होते की आपण या जगात एखाद्या प्रवाशाप्रमाणे आलेलो आहोत. या जगातील घर आपले खरे घर नसून येथील धर्मदेखील आपला खरा धर्म नाही. गुरू नानकदेवजी म्हणतात:

जो घर छड्डु गँवावणा, सो लग्गा मन माहें ।
जित्थे जाए तुध वरतणा, तिसकी चिन्ता नाहे ।।

जे घर आपण कधी ना कधी त्यागणार आहोत, ते घर उभारण्यात व सजविण्यात आपण स्वत:स झोकून देतो. परंतु ज्या घरी जाऊन आपण कायमचे वास्तव्य करणार आहोत, त्या घराची आपणांस काळजी नाही, किंबहुना त्यास आपण विसरूनच गेलो आहोत. फरीदसाहेब सांगतात:

गोर निमाणी सड करे, निगरयां घर आओ ।
सरबर मैथो चलणा, मरने क्यों डराय ।।

कबर आपणांस सांगते की तुझे खरे राहण्याचे ठिकाण माझ्या आतच आहे, तू मला का घाबरतोस? कबीर साहेब म्हणतात:

ईट सिरहाने होए सबन, कीड़ा गणयो माँस ।
केतड़यां जुग बीत गए, इकद भया पास ।।

संतांच्या संगतीचा हाच फायदा असतो की ते आपणांस आपल्या खऱ्या घराची, आपल्या खऱ्या वास्तव्याच्या ठिकाणाची केवळ माहिती देतात असे नाही, तर आपणांस तेथे जाण्यासाठी मदतदेखील करतात.

दिना चार तन संग बसेरा, फिर छूटे यह ग्राम ।

स्वामीजी महाराज प्रेमाने सांगतात, 'आपले हे वास्तव्य कायमस्वरूपाचे नाही. परमात्म्याने आपणांस मोजकेच श्वास दिलेले आहेत. त्याप्रमाणे दिव्यातील तेल संपल्यावर दिवा मालवतो, त्याचप्रमाणे आपले श्वास संपल्यावर आपली श्वास–मालिका थांबते. लोक त्याचवेळी इतरांना टेलिफोनद्वारे तसेच रेडिओद्वारे देखील संदेश पोहोचवितात की अमुक एका व्यक्तीचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. परमात्म्याने आपल्या आत्म्यास त्याच्या चार दिवसांच्या वास्तव्यासाठी हे शरीररुपी ठिकाण दिले असून, आपणांस हे शरीर तसेच येथील घरदेखील त्यागून जावे लागणार आहे.'

धन दारा सुत नाती कहियन, यह नहिं आवें काम ।

स्वामीजी महाराज आपणांस इशारा देतात की या जगात येऊन तुम्ही कोणत्या गोष्टीचा अहंकार करता? धनाचा अहंकार असल्यास गरीबांना धना अभावी रस्त्यावर तळमळताना पाहत नाही का? मुले-नातवंडांचा आपणांस अहंकार असल्यास, ते आपल्या मृत्यूसमयी आपली काही मदत करू शकतात काय? ते आपल्यासोबत जातील काय? कबीर साहेब सांगतात:

घर की नार बहुत हित जास्यो, सदा रहत संग लागी ।
जब ही हंस तजी यह काया, भूत भूत कर भागी ।।

ज्या स्त्रीसोबत तिच्या पतीचे आयुष्यभराचे घनिष्ट नाते असते, पतीच्या निधनानंतर ती विचार करते की आता याच्या शरीरात प्राण राहिले नाहीत. केवळ स्त्रीच नाही तर पुरुषांमध्येदेखील ही कमतरता असते. अशावेळी आई-वडील, मुले-मुली, धन-संपत्ती कशी बरे आपली सोबत करतील?

स्वाँस दुधारा नित ही जारी, इक दिन खाली चाम ।

स्वामीजी महाराज आम्हा गाफीलपणाच्या निद्रेत असलेल्यांना जागृत करण्यासाठी समजावत आहेत की, आपली श्वासांची माळा दोन्ही बाजूंनी म्हणजेच श्वास घेताना खालून वरती, तसेच श्वास सोडताना वरून खाली फिरत आहे. अशा रीतीने मोजक्याच श्वासांची मिळालेली पुंजी श्वास घेताना आणि श्वास सोडताना अशी दोन्ही बाजूंनी कमी-कमी होत आहे. निद्रावस्थेत-जागृतावस्थेमध्ये, चालता-फिरताना श्वासाची पुंजी कमी होत असतानाही, मनुष्य कसा गाफील अवस्थेमध्ये बसून आहे!

मशक समान जान यह देही, बहती आठों जाम ।

जसे एखादी पखाल हवेने वा पाण्याने भरली व तिचे एखाद्या बाजूचे तोंड उघडे राहिल्यास, कधी ना कधी रिकामी होतेच. एखादा तलाव पाण्याने कितीही काठोकाठ भरलेला असो, त्या तलावास जर छिद्र पाडून पाणी वाहण्यासाठी एखादा पाट तयार केल्यास, तो तलावदेखील रिकामा होतो.

तू अचेत गाफिल हो रहता । सुने न मूल कलाम ।

स्वामीजी महाराज सांगत आहेत, तू निश्चिंत बसलेला आहेस, कदाचित तुझा कधीच मृत्यू होणार नाही, या जगातील सुखोपभोग घेण्यासाठीच तुझा जन्म झालेला आहे, या विचारांमध्ये तू गाफीलपणे बसला आहेस. सचखंडामधून येणारा परमात्म्याचा आवाज अखंडित तुझ्या मस्तिष्कामध्ये मागील बाजूस गुंजत आहे, तुला हाक देत आहे. आपण जर आपले तन व आपले विचार पवित्र राखले तर आपले मनदेखील पवित्र राहिल. परमात्म्याचा ध्वनी आपण जर योग्यरीतीने ऐकला तर आपल्या लक्षात येईल तो ध्वनी आपणांस काय सांगत आहे? परंतु आपण काय करतो?आपले प्रश्न, आपल्या समस्या परमात्म्यासमोर मांडतो, परमात्म्यासमोर प्रर्थना करीत रहातो, परंतु परमात्मा त्याचे देत असलेले उत्तर मात्र ऐकत नाही.

माया नारि पड़ी तेरे पिछे । क्यों नहिं छोड़त काम ।।

प्रत्येक संतांनी काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार या पाच विकारांचा त्यांच्या लिखाणामध्ये उल्लेख केलेला आहे. काही संतांनी त्यांना दरोडेखोर, तर काहींनी त्यांस चोर किंवा ठग असेही म्हटले आहे. त्यापैकी काम व क्रोध या दोहोंचा उल्लेख स्वामीजी महाराज येथे करीत आहेत. कामामुळे आत्म्याची अवनती होते, कामी मनुष्य पारमार्थिक उन्नती करू शकत नाही. क्रोधामुळे मनुष्याचे लक्ष विखुरले जाते. त्यास परमात्म्याचा शब्द-ध्वनी ऐकू येत नाही. हे एक सत्य आहे की क्रोधी मनुष्यास जेव्हा क्रोध आलेला असतो, तेव्हा जर त्यास एखाद्या डॉक्टरकडे नेऊन त्याचा रक्तदाब तपासल्यास कळते की त्याचा रक्तदाब वाढलेला तरी असतो किंवा फार कमी झालेला असतो.

बिन गुरू दया छुटो नहिं या से । भजो गुरू का नाम ।।

स्वामीजी महाराज सांगत आहेत, आपण आजारी पडल्यावर जेव्हा डॉक्टरकडे जातो, तेव्हा डॉक्टर आपली बारकाईने तपासणी करतात व आपल्या आजारास अनुसरुन आपणांस औषधपाण्यासोबत काही पथ्येदेखील पाळण्यास सांगतात. ती पथ्ये पाळणे आजाऱ्यासाठी अतिशय गरजेचे असते.

महाराज सावन सिंहजी सांगतात, डॉक्टरने दिलेले औषध न घेता, पथ्य न पाळता आजारापासून कशी बरे सुटका होईल? संत सांगतात की आपण सर्वजण आजारी आहोत, आपणांस जन्म-मरणाचा आजार जडलेला आहे. तसेच काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार हे देखील आजारच आहेत. या पाच जणांना आपल्या काबूत करण्याऐवजी आपणच जेव्हा त्यांच्या आहारी जातो व त्यांचा दास बनतो, तेव्हा ते आपल्या वरचढ होतात व आपण आजारी होतो. नामदान देते वेळी संतदेखील आपणांस काही पथ्ये सांगतात, ज्यांचे पालन करणे सेवकांसाठी अत्यंत गरजेचे असते. संतांनी दिलेल्या औषधांचे सेवन जर आपण त्यांनी सांगितलेल्या पथ्यांचे पालन करीत केले तर काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार आपले धनी होणे शक्यच नाही. ते खरेतर आपले दास बनूनच आपल्यासोबत राहतील.

जगत पास से लेते दान, गोविंद भक्त को करे सलाम ।

आपला स्वाअनुभव आहे की जो शिष्य त्याच्या सतगुरूच्या आदेशाचे पालन करतो, शब्द-नामाची कमाई करतो, स्वतःचे लक्ष एकाग्र करीत, त्यास दोन्ही नेत्रांच्या पाठीमागे केंद्रीत करीत आत्म्यावरील स्थुल, सुक्ष्म कारण या आवरणांना दूर करतो, तेव्हा वरील पाचही डाकू त्याचे मित्र बनतात, ते त्यास त्रास देत नाहीत.

स्वामीजी महाराज सांगत आहेत,'जो विद्यार्थी शाळेत गेल्यावर शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे अभ्यास करतो, शिक्षकदेखील अशा विद्यार्थ्यांवर जास्त लक्ष देतात. त्याचप्रमाणे जो शिष्य त्याच्या सतगुरूंनी सांगितल्याप्रमाणे 'शब्द-नामाची' कमाई करतो, त्यांनी दिलेल्या सूचनांचे (पथ्यांचे) पालन करतो, सतगुरूदेखील त्या शिष्याकडे विशेष लक्ष देतात. आपल्या कर्मांनुसार आपणांस जडलेल्या आजारांपासून आपण केवळ सतगुरूंच्या कृपेने, ध्यान-अभ्यास व नामस्मरण केल्यानेच, आपली सुटका करवून घेऊ शकतो.'

गुरू का ध्यान धरो हिरदे में । मन को राखो थाम ।।

आपण प्रेमाने समाजावत आहात की घोडा कितीही चंचल, बेभान असेल, स्थिर उभा राहत नसेल, त्याच्या तोंडामध्ये लगाम टाकल्यास तो आपोआप स्थिर होतो. आपले मनदेखील एक चंचल घोड्याप्रमाणे आहे. ज्याच्या तोंडामध्ये नामस्मरणरूपी लगाम टाकणे गरजेचे आहे.

आपण जेव्हा एखाद्या गोष्टीचे स्मरण करू लागतो, तेव्हा त्या गोष्टीचे स्वरूप आपोआपच आपल्या दोन्ही नेत्रांमागे प्रगट होऊ लागते. त्याचप्रमाणे सतगुरूंनी दिलेल्या नामाचे स्मरण जेव्हा आपण चालता-फिरता, उठता-बसता करू लागतो, तेव्हा सतगुरूंचे स्वरूप आपोआपच आपल्या अंतर्यात स्थिरस्थावर होऊ लागते. ज्यावेळी नामस्मरणाचा आपला कोर्स पूर्ण होईल तेव्हा जागृत व निद्रावस्थेतदेखील सतगुरूंचे स्वरूप आपल्या अंतर्यात पूर्णपणे स्थिरस्थावर होईल, त्यावेळी आपण सतगुरूंचे खरे शिष्य बनू. यास म्हणतात:

अकाल मूर्त है साध संतन की, ठहरने की ध्यान को ।

महाराज सावन सिंहजी ध्यान-अभ्यासास अतिशय महत्त्व देत असत. महाराज कृपाल म्हणत असत, 'खुदा तोच आहे जो खुद (स्वतःच) प्रगट होईल.' असे म्हणण्यामागे महाराज कृपालजींचा हाच उद्देश होता की, सतगुरूंचे नामस्मरण आपल्या जिव्हेवर रात्रं-दिवस आरूढ झाल्यास, त्यांचे स्वरूप आपोआपच तुमच्या अंतरामध्ये प्रगट होईल.

वे दयाल तेरी दया विचारें । दम दम करें सहाम ।।

ज्यावेळी मूल आईच्या मांडीवर असते, तेव्हा त्यास आंघोळ कधी घालावी? त्यास कधी खाऊ घालावे? त्यास कधी उन्हातून सावलीमध्ये ठेवावे? या सर्व गोष्टींची काळजी आई घेत असते. याचप्रमाणे आपण जेव्हा सतगुरूंचे स्वरूप आपल्या अंतरामध्ये प्रगट करवून घेतो, तेव्हा सतगुरू आपले क्षणोक्षणी रक्षण करीत असतात.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, 'आपणांस जर आपल्या घरामध्ये कपाट व इतर कोणती वस्तू बनवून घ्यावयाच्या असल्यास तुम्ही वेळोवेळी

सुतारास घरी बोलावत राहाल, तर त्यासाठी तुमचा किती वेळ व पैसा व्यर्थ जाईल. त्याऐवजी तुम्ही त्या सुताराशी प्रेमाचे संबंध बनवून त्यास घरीच ठेवून घेतल्यास, त्या सुताराद्वारे तुम्ही हवी ती वस्तू बनवून घेऊ शकाल.

प्रियजनहो! आपली अवस्था अशी आहे की, आपण जे काही तास-अर्धा तास नामस्मरण करतो, बाकीचे जागृतावस्थेमधील चौदा-पंधरा तास आपण नामस्मरण विसलेलो असतो. खरेतर आपण दररोज चार-पाच तास जरी ध्यान-अभ्यास केला, तरीही जगाचे पारडे जडच राहते. तसे पाहिल्यास नामस्मरण करणे काही विशेष अवघड नाही. मुले खेळता-खेळता एक, दोन, तीन असे आकड्यांचे उच्चारण करतात, तसेच ते खेळामध्ये रममाणही झालेले असतात, याचप्रमाणे आपण आपापले काम करतानाही नामस्मरण मात्र मनाद्वारे चालूच ठेवा. ध्यान-अभ्यास करीत जो अंतर्यात जातो, तो गुरूमतास कधीच खोटे ठरवत नाही. खरेतर तो गुरूमताचाच होऊन जातो.

स्वामीची महाराज सांगतात, ध्यान-अभ्यास करताना सतगुरू दयेचा वर्षाव करीत आपली सहाय्यता करीत असतात, जिच्या मदतीने आपण परब्रह्मामध्ये पोहचणे आवश्यक आहे. नि:संशय सतगुरू या बाह्य जगात देखील आपली मदत करीत असतात. सतगुरू कसे पावलोपावली आपला सांभाळ करतात, याचा सेवक अनुभवही घेत असतात, परंतु तरीही आपले मन आपली फसवणूक करत असते.

मी अनेकदा हा किस्सा सांगत असतो की बलवंत जेव्हा माझ्याकडे आली, तेव्हा ती अतिशय लहान होती. मी जेव्हा माझ्या सत्संगानिमित्त पहिल्या विश्वदौऱ्यावर गेलो असता, ती लहान असल्याने अतिशय उदास होऊन ७७ आर.बी. आश्रमाच्या बाहेर येऊन बसली. महाराज कृपालजींनी त्यावेळी प्रत्यक्ष स्वरूपात प्रगट होऊन तिला प्रेमाने कुरवाळले व म्हणाले, ''बच्चू! मी तुझ्या जवळच आहे. त्यामुळे तुला उदास होण्याचे काय कारण?'' तिने मला त्यासंबंधी अमेरिकेस पत्र पाठविले. मी ते पत्र तेथील अनेक प्रेमींना दाखवित म्हणालो की सतगुरू अंतरामध्ये आपला सांभाळ करतातच

परंतु बाह्यजगातदेखील आपला सांभाळ करतात. परंतु आपण कृतघ्न असतो. त्यांनी केलेल्या उपकारांचा आपणांस विसर पडतो.

छोड़ भोग क्यों रोग बिसावे । या में नहिं आराम ।।

स्वामीजी महाराज सांगतात, तुम्हांस जे भोग प्रिय वाटतात, ज्यांबद्दल तुम्हांस इतकी आवड आहे की त्या भोगांच्या आवेशामध्ये जेव्हा तुम्ही येता तेव्हा निद्रेचादेखील त्याग करता, या भोगांमुळे तुमच्या वाटेस केवळ आजार व अस्वस्थताच येते. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

भोगों रोग सो अंत बिगोवे, आए जाए दुख पाऐंदा ।

गुरू का कहना मान पियारे । तो पावे विश्राम ।।

आपणांस जर अंतर्यात तसेच बाह्य जगात शांती प्राप्त करावयाची असल्यास, सतगुरूंच्या आदेशांचे पालन करावे. ते आपणांस ध्यान–अभ्यास करीत शब्द–नामाची कमाई करण्यास सांगतात. विषय–विकारांपासून आपल्या मनास परावृत्त करण्यास सांगतात, कारण आपल्या मनाची याअगोदर कधी ना तृप्ती झालेली आहे ना या पुढे होईल.

दुख तेरा सब दूर करेंगे । देंगे अचल मुकाम ।

स्वामीजी महाराज ज्यामुद्द्यावरून वाणीस सुरुवात केली होती, तेथेच अखेरीस आले आहेत की हे जग **सुख–दु:खाची नगरी** असून तुम्ही हिचा त्याग करून आपल्या नगरीस म्हणजेच सचखंडास पोहचावे. आपण जेव्हा चालता–फिरता, उठता–बसता सतगुरूंच्या आठवणीमध्ये रममाण होतो, त्यांच्या आदेशाचे पालन करीत ध्यान–अभ्यास व नामस्मरण करतो, तेव्हा पुढे आपली जबाबदारी ते घेतात. या जगात, **सुख–दु:खाच्या नगरी**त वारंवार फेऱ्या मारण्याचे जे आपले दु:ख आहे, त्या दु:खाचे ते निवारण करतात. ते आपणांस प्रलय वा महाप्रलयामध्ये विनाश न पावणाऱ्या स्थाई मंडळामध्ये, आपल्या मुक्कामी आपणांस घेऊन जातात.

राधास्वामी कहत सुनाई । खोज करो निज नाम ।।

स्वामीजी महाराज आपणांस प्रेमाने समजावत आहेत की, समाजातील लोक आपणांस नरकाची भीती किंवा स्वर्गाचे लालच देत आपणांद्वारे भक्ती करवितात व दान पदरी पाडून घेतात. त्यांनी स्वत: ना स्वर्ग पाहिलेला असतो, तसेच ते आपणांस स्वर्गामध्ये नेऊही शकत नाहीत. संतांचा मार्ग हा प्रेमाचा मार्ग आहे. ते ना आपणांस भीती घालतात ना ते लालच देतात. अल्लाह, वाहेगुरू, राम, रहीम, गॉड ही सर्व शाब्दिक नावे आहेत, आपण त्यांचादेखील मान राखतो.

संत प्रेमाने सांगतात की वरील शब्द ज्या शक्तीचा उल्लेख करीत आहेत त्या शक्तीचे नाव 'नाम' आहे. आपण त्या नामरुपी शक्तीस भेटायचे आहे. त्या शक्तीस स्वामीजी महाराज 'निजनाम' असे संबोधतात.

कोर्टात जर एखाद्या न्यायमूर्ती समोर आपली केस न्याय-निवाड्यासाठी येणार असेल, त्या न्यायमूर्तीच्या नावाचा दररोज जप केल्याने वा त्याच्या फोटोसमोर धूप-आरती केल्याने तो फोटो आपला न्याय-निवाडा करू शकेल काय? आपण दररोज फोटोसमोर करीत असलेल्या मोठ-मोठ्या प्रार्थनांची त्या न्यायमूर्तीस कशी बरे जाणीव असेल? म्हणून संत-महात्मा समजावतात की आपण स्वत: आपल्या नेत्रांनी परमात्म्याचे दर्शन घ्यावे, मग त्यास प्रार्थना करावी की 'हे परमात्मा! आम्हांस जन्म-मरणाचे दु:ख-कष्ट आहे, त्याचे तू निवारण करावेस. आम्हांस रात्रंदिवस माकडाप्रमाणे नाचविणाऱ्या पाच दरोडेखोरांपासून आमचे रक्षण कर, आम्ही अनाथ आहोत.'

मी माझा मांझूवास गावातील प्रसंग तुम्हांस सांगतो. माझ्या सैनिकी नोकरीमधील काही रक्कम पोस्टात आली असता, ती घेण्यासाठी मी पोस्टात गेलो. तेथे शाळेतील पंधरा-वीस शिक्षक राहत असत. ते दररोज एका देवाच्या फोटोसमोर धूप-आरती करीत असत. धूप दिल्याने त्या फोटोवर चिकट थर जमा झाला होता, त्यामुळे एके रात्री उंदरांनी त्या फोटोचा अर्धाभाग कुरतडून टाकला. ते मला म्हणाले,''आम्ही आपले पैसे देणारच आहोत, परंतु त्या अगोदर आमच्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.''

मी म्हणालो, ''ठिक आहे बंधुंनो! तुमचा काय प्रश्न आहे?'' त्यांनी तो उंदरांनी अर्धवट कुरतडलेला फोटो आणून माझ्यासमोर ठेवत, मला विचारले की''आम्ही सुशिक्षित आहोत, तरी देखील आम्हांस हे समजत नाही की जर या फोटोतील देव उंदरांस हटवू शकला नाही, तर तो आमचा उद्धार कसा काय करू शकेल?'' मी त्यांना हसून म्हणालो की, ''तुम्ही अंतर्यात ज्या पातळीवर हा देव दर्शन देईल, त्या पातळीवर तुम्ही जावे व त्या देवाचे दर्शन घ्यावे. त्यावेळी तुम्ही तुमचे खरे कर्तव्य पूर्ण कराल. तुम्ही तर त्या देवास भेटलेला नाहीत, मग केवळ चित्राचा काय फायदा?''

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''तुम्ही जर संतांचा फोटो घरात भिंतीवर लावणार असाल, तर आपले एक मित्र वा आदर्श वडिलधारी व्यक्ती समजून लावा. तुम्ही जर ध्यान-अभ्यास करीत नसाल व केवळ त्या फोटोस नमस्कार करीत राहिलात तर त्यामध्ये संतांचा काय दोष आहे?''

***

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या अपार दयेने **संतबानी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान** येथे **सत्संगाचे कार्यक्रम** आयोजित केले जात आहेत. सर्व बंधू-भगिनींनींच्या चरणी नम्र विनंती आहे की त्यांनी कार्यक्रमात सहभागी होऊन आश्रमातील शांत वातावरणात ध्यान-अभ्यास करण्याचा व संतवचनांचा लाभ घ्यावा. कार्यक्रमांच्या तारखा:

७ ते ११ सप्टेंबर २०१४ ● २४ ते २६ ऑक्टोबर २०१४

२८ ते ३० नोव्हेंबर २०१४ ● २६ ते २८ डिसेंबर २०१४

तसेच परमसंत अजायब सिंह महाराजांच्या अपार दयेने **मुंबई शहरात** त्यांच्या मधुर आठवणीत **७ ते ११ जानेवारी २०१५** रोजी सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. सर्व बंधू-भगिनींनी कार्यक्रमात सहभागी होऊन नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

कर्मांची परतफेड

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे
संत बानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – २ जानेवारी १९९१

एक प्रेमी : माझा कर्मांविषयी एक विचित्र प्रश्न आहे. आमच्या कर्मांनुसार आम्हांस आजार होईल, ज्यात आम्हांस शारीरिक त्रास सहन करावा लागेल तसेच डॉक्टर व औषधोपचारांवर होणारा खर्च करावा लागेल. जेव्हा आपणांस अशाप्रकारच्या कर्मांस सामोरे जावे लागते तेव्हा आपण ते कर्म सहन करावे वा सर्वकाही सतगुरूंवर सोडून द्यावे?वा अशाप्रकारे अचानक येणाऱ्या **कर्मांच्या परतफेडीसाठी** अगोदरच काही उपाययोजना करावी उदा. आजारपणावर होणाऱ्या खर्चासाठी विमा पॉलिसी काढून तरतूद करणे. याबद्दल आपण मला काही सल्ला द्यावा, कारण कर्मांची परतफेड करताना आजारपण आले असता अनेकदा खूप पैसे खर्च करावे लागतात. त्यामुळे प्रेमींना कधी–कधी अडीअडचर्णीना तोंड द्यावे लागते.

बाबाजी : बंधुनो! हा अतिशय चांगला प्रश्न आहे. मी माझ्या स्वत:तर्फे काही सांगण्याऐवजी महाराज सावन सिंहजींनी या बाबतीत सांगितलेल्या वचनांची पुनरावृत्ती करतो. ही वचने यापूर्वीदेखील अनेक सत्संगांमध्ये मी सांगितलेली आहेत. कर्मांबद्दल बोलताना महाराज कृपालजींनीदेखील त्यांच्या सत्संगांमध्ये या वचनांची पुष्टी केलेली आहे. तुलसीसाहेब सांगतात :

कर्मप्रधान विश्व रच राखा, जो जस कीन्ह सो तस फल चाखा।

महाराज सावन सिंहजी सांगत असत, जीवात्मा मातेच्या उदरामध्ये नंतर प्रवेश करतो, त्याचे प्रारब्ध अगोदरच तयार झालेले असते. सुख–दु:ख श्रीमंती–गरीबी, निरोगीपणा–आजारपण या सहा गोष्टी अगोदरच ठरवून प्रारब्धामध्ये लिहिलेल्या असतात. परंतु यागोष्टी त्यास का भोगाव्या लागतात याचे त्यास ज्ञान नसल्याने तो दु:खी होतो. तुलसीसाहेब सांगतात:

पहले बनी प्रालब्ध पाछे बना शरीर।
तुलसी दासा खेल अचरज है पर मन नहीं बंधता धीर।।

नामदानाच्या वेळी सुरुवातीसच तुम्हांस सांगितले जाते की, आपले खरे रूप शरीर नसून आत्मा आहे. शरीर केवळ आपल्या **कर्मांची परतफेड** करण्यासाठी प्राप्त झालेले असते. महाराज कृपाल सांगत,''बाण एकदा का धनुष्यातून सुटला की मग कितीही प्रयत्न केले तरी त्यास मागे आणू शकत नाही. त्याप्रमाणे एखाद्या आत्म्याचे प्रारब्ध तयार झाल्यानंतर संत त्यामध्ये फेरबदल करीत नाहीत, त्यास वेगळे ठेवतात. ते आत्म्यास नामाशी जोडतात.''

आपणांस नेहमी सांगितले जाते की, आत्म्यावर स्थूल, सूक्ष्म व कारण ही तीन आवरणे चढलेली आहेत. ज्याप्रमाणे एक पिंजरा दुसऱ्या पिंजऱ्यामध्ये व दुसरा पिंजरा तिसऱ्या पिंजऱ्यामध्ये असतो. स्थूल जगाची निर्मिती सूक्ष्म जगामधूनच झालेली आहे. संतांच्या सांगण्यानुसार जर आपण आपल्या आत्म्यावरील स्थुल आवरण दूर करीत सूक्ष्म जगात प्रवेश केल्यास, प्रत्येक घटना घडण्यामागचे कारण काय आहे, याचे ज्ञान आपणांस होते. हे सर्व ज्ञान आपणांस एखादे उघडे पुस्तक वाचण्याइतके सोपे प्राप्त होते.

महाराज कृपाल सांगत,''संत सेवकास नामदानाचे बक्षीस देतेवेळी अशी व्यवस्था करतात की सेवक त्याच्या **कर्मांची परतफेड** करीत असता अंतर्यात प्रगती देखील करीत रहातो.'' आपण काळाच्या ज्या स्थुल जगात वास्तव्य करीत आहोत, त्याची संरचना काळाने केलेली आहे. तो बदला देण्या–घेण्याचा देश आहे. जर एखाद्या मनुष्याने दुसऱ्याचे नेत्र काढले, तर काळ देखील त्याचे नेत्र काढण्याची त्यास शिक्षा देतो. जो दुसऱ्याची हत्या करतो, त्यास पुढल्या जन्मी त्याच प्रकारे कर्मांची परतफेड करावी लागते.

दयाळच्या (परमात्म्याच्या) राज्यात मात्र माफीच असते. तेथे बदल्याचे नामोनिशाण देखील नसते. काळाच्या देशाची हद्द पार करून आपण जेव्हा दयाळच्या देशात जातो, तेव्हा आपणांस माफी मिळते. सतगुरू या जगात आत्म्यांना माफी देवविण्यासाठीच येतात. गुरू नानकदेवजी सांगतात:

दद्‌ा दोष न दीजे काहू, दोष कर्मा आपणया ।
जो मैं कीता सो मैं पाया, दोष न दीजे अवर जणा ।
दोष किसे दे प्राणी सब अपना किया कराया हे ।।

आता प्रश्न असा उद्भवतो की आपणांस जर पूर्वकल्पना असेल तर आपण त्यासाठी तयारी करावी का? त्यासाठी काही हरकत नाही. जन्मपत्रिका पाहून भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषाकडे जेव्हा आपण जातो, तेव्हा ते अनेक भविष्यवाण्या करतात. कोणा ज्योतिषाची भविष्यवाणी खरी ठरते तर कोणाची खोटी ठरते. ज्योतिषी सांगतात की, तुझ्यावर अमुक एका ग्रहाची अवकृपा असून अमुक एक उपाय केल्यास ती अवकृपा दूर होईल. परंतु संतांचा स्वानुभव असा आहे की, कोणीही स्वत:च्या **कर्मांचे भोग** टाळू शकत नाही. तो भोग त्यास भोगावाच लागतो.संत आम्हांस ना अशा जन्मपत्रिका पाहणाऱ्या ज्योतिषाकडे पाठवितात, ना ते स्वत: यावर विश्वास ठेवतात. संत सांगतात:

लेख न मिटया हे सखी जो लिखया करतार ।

या संबंधात मी माझ्या एका नातेवाईकाची गोष्ट सांगतो. तो जन्मपत्रिका पाहून ज्योतिष सांगणाऱ्या एका पंडिताकडे गेला असता, त्यास त्याने काही पैसे दिले. त्या पंडिताने त्याच्या ज्योतिष शास्त्राप्रमाणे कुंडली पाहून काही आकडेमोड केली व त्यास सांगितले की, अमुक एका नातेवाईकाकडे, अमुक महिन्यात गेल्यास तू आजारी पडशील व त्यातून तू बचावणार नाहीस. त्या मनात बसलेल्या भ्रमाच्या प्रभावाने तो त्याच्या नातेवाईकाकडे त्या महिन्यामध्ये गेला नाही. पुढील्या महिन्यात त्या नातेवाईकाकडे गेला असता त्यास अगदी किंचित ताप आला. त्यास तापाचा त्रास कमी होता, परंतु त्या पंडिताने त्याच्या मनात निर्माण केलेल्या भ्रमामुळे त्यास जास्त त्रास होत होता.

त्या दिवसांमध्ये मी वैद्याचे काम करीत असे. त्या भ्रमापोटी आजारी पडलेल्या मनुष्याचा एक नातेवाईक येऊन सांगू लागला की, आपला सरदारजी (आजारी मनुष्य) त्याचे शरीर त्यागण्याच्या तयारीत आहे. मी घाईघाईने जीपचा दोन तासाचा प्रवास करून त्याच्या घरी पोहचलो. तो आताच शरीर सोडत आहे, अशा मन:स्थितीमध्ये माझ्याशी बोलू लागला. तो वारंवार म्हणू लागला की तुम्ही पंडित–ज्योतिषावर विश्वास ठेवत नाही, परंतु त्यांनी माझ्या बाबतीत सांगितलेले भविष्य खरे ठरत आहे. मी त्यास म्हणालो,

''बंधु, मी वैद्य आहे. माझ्या सतगुरूंचा आसरा मानीत तुला औषध देईन. मी तुला लिहून देतो की, तुझा आता मृत्यु होणार नाही. परंतु अखेरीस तुला कधी ना कधी मरण तर येणार आहेच.''

मी जेव्हा तेथून निघू लागलो, तेव्हा त्याचे नातेवाईक शुभशकुन झाल्यावर केले जाणारे प्रकार करू लागले. मी त्यांना म्हणालो, ''प्रियजनहो! गुरू नानकदेवजी सांगतात की जे लोक परमात्म्यास विसरतात, त्याचे स्मरण करीत नाहीत, त्याच लोकांवर शकुन-अपशकुनांचा परिणाम होतो.'' मी त्यास औषध दिले. मी परतताना दोन मैलांचे अंतर पार करण्याआधीच त्यास बरे वाटू लागले. तो त्याचे गांव येईपर्यंत पूर्ण बरा झाला. संध्याकाळी त्याच्या पत्नीस तो म्हणाला, ''बाबाजी भलेही विश्वास ठेवीत नाहीत. परंतु त्या ज्योतिषाचे भविष्य खरे ठरले. मी मरणार आहे, हा विचार काही त्याच्या हृदयामधून गेला नाही. मग मात्र मी कठोर शब्दांत त्यास म्हणालो,''मी तुला औषध दिलेले आहे, तू आता मरून तरी दाखव.''तो प्रेमी अजूनही सत्संगास येतो. आम्ही हसत-हसत त्यास म्हणतो, ''तू आजही जिवंत आहेस?'' ही घटना कमीत कमी तीस वर्षांपूर्वीची आहे. प्रियजनहो! पुढे येणाऱ्या भविष्याची काळजी हृदयास पिडा देते, आजारपण येण्याअगोदरच आजारी पडणे वाईट आहे. खरेतर ती घटना घडेल की नाही याची आपणांस कल्पनाच नसते.

प्रियजनहो! विमा (पॉलिसी) काढणे चुकीचे आहे असे मी म्हणत नाही. जगात विमाची स्कीम चांगली आहे, हवं असेल तर विमा पॉलिसी घ्यावी. आता प्रश्न निर्माण होतो की आपण आपल्या कर्मांचे भोग सहन करावे की त्यासाठी काही उपाय योजना करावी? सर्व संत सांगतात की आजाराचा इलाज करणे, आपले प्रथम कर्तव्य आहे. परंतु आपण होणारा त्रास दैवी इच्छेनुसार आहे असे मानून, तो आपल्या पूर्वकर्मांमुळेच आपणांस भोगावा लागत आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे. यामुळे डॉक्टरांशी आपले जे काही पूर्वजन्माचे देणेघेणे बाकी आहे, त्याची परतफेड होते. तसेच आपल्या पूर्वकर्मांचे कर्जदेखील कमी होते. स्वामीजी महाराज सांगतात :

दुख की घड़ी गनीमत जानो, सुख में रहत सदा मन गाफिल ।

सुखांमध्ये आपले मन गाफील राहते. दु:खांमध्ये मात्र आपल्या मनाचा झुकाव परमात्म्याच्या दिशेला असतो. आपण हृदयापासून परमात्म्याची विनवणी करतो की, या आजारपणापासून माझी सुटका कर, तसेच पैसे खर्चून आपल्या कर्मांचे ओझे काहीसे कमीदेखील होते.

संत आपणांस हातावर हात ठेवून शांत बसून राहण्यास कधीच सांगत नाहीत. पुरुषार्थ करणे मनुष्याचे प्रथम कर्तव्य आहे. आपणांस आजारपण दोन प्रकारांनी येते. आपण शांतपणे विचार केल्यास आपणांस त्यांची जाणीव होणे काही विशेष अवघड नसते. एकतर आपणांस स्वत:च्या चुकांमुळे व निष्काळजीपणामुळे आजारपण येते, जे थोडेफार उपचार केल्याने दूर होते, आपले शरीर निरोगी बनते. दुसरे म्हणजे आपल्या पूर्वकर्मांमुळे येणारे आजारपण जे भोगल्याशिवाय आपली सुटका होत नाही. मी अगोदरच सांगितले आहे की, अशा आजारपणात डॉक्टरवर व औषधांवर होणाऱ्या खर्चांमुळे आपल्या कर्मांचे ओझे कमी होते. परंतु याप्रमाणे उपचार करूनही जर आजारपण कमी झाले नाही, तर आपण त्यासाठी सतगुरूंना दोषी ठरवू नये की त्यांनी आपली काही मदत केली नाही. कारण सतगुरु योग्य तेवढी आपली मदत नक्कीच करत असतात. अशा प्रसंगी आपण सहनशिलता राखणे व परमेश्वराची मर्जी मानून प्रसंगास सामोरे जाण्यामध्येच आपला फायदा असतो.

आयुर्वेदामध्ये औषधी वनस्पतींचे वर्णन केलेले आहे. तेथे गोरखनाथाची एक प्रसिद्ध गोष्ट नमूद केलेली आहे. गोरखनाथ खूप कमाई केलेले महात्मा होते. त्यांच्या डोक्यावर एक फोड आला होता, ज्यावर त्यांनी खूप उपचार केले. तो फोड कमी होण्याऐवजी वाढतच चालला होता. गोरखनाथांनी त्या फोडाचा त्रास बारा वर्षे सहन केला. बारा वर्षांनी जेव्हा ते कर्म भोगण्याचा कालावधी पूर्ण झाल्यावर, त्यांच्या तप करण्याच्या स्थानाजवळ असलेली एक वनस्पती बोलू लागली की,''हे गोरखनाथा! मला कुस्करून तू तुझ्या फोडावर लावल्यास, तुझा फोड बरा होईल. गोरखनाथांना कर्मांच्या तत्त्वज्ञानाचे

ज्ञान होते. गोरखनाथ त्या वनस्पतीस म्हणाले,''हे बघ! तू तर याअगोदरदेखील येथेच होतीस. परंतु कर्माचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच तू बोलली आहेस. आता यापुढे तुला गोरखमुंडी असे संबोधले जाईल.'' साधारणत: फोड–पुरळींवर उपचारासाठी तयार केल्या जाणाऱ्या औषधांमध्ये गोरखमुंडी या वनस्पतीचाच वापर केला जातो. आपण जेव्हा आपल्या **कर्मांचे भोग** भोगत आजारपणावरील उपचारांसाठी जेव्हा डॉक्टरकडे जातो, तेव्हा डॉक्टरांना आपल्याप्रती खूप सहानुभूती असते. आपल्याकडे आला असलेल्या रोग्यास त्रास–वेदना व्हाव्यात असे कोणाही डॉक्टरला वाटत नाही. रोगी बरा होऊ नये अशी त्यांची कधीच इच्छा नसते. किंबहुना ते त्यांच्या तनामनाने अथक प्रयत्न करतात की जेणेकरून रोगी लवकरात–लवकर बरा व्हावा व त्यास निरोगी करण्यात त्यांना यश प्राप्त व्हावे. परंतु कित्येकदा आपल्या कर्मभोगांचा कालावधी बाकी असल्याने, बरे होण्यास वेळ लागतो. अशावेळी आपण त्या डॉक्टरास दोष देण्याऐवजी सहनशीलतेचा अंगिकार करणे गरजेचे असते.

महाराज सावन सिंहजी नेहमी त्यांच्या सत्संगांमध्ये **कर्मांची परतफेड** करण्या विषयी उदाहरण देऊन सांगत असत की कशारितीने आपणांस पुढील जन्मी पुन्हा तेथेच जाऊन **कर्मांची परतफेड** करावी लागते! महाराजजी सैन्यामध्ये नोकरी करीत असताना, फ्रंटीयर येथे काम करीत होते. सैन्यामध्ये सावकार लोकांसाठी कँटीनदेखील असे. तेथे जाऊन सैन्यदळातील सैनिक सावकारांकडे आपले पैसे जमा करीत व सुट्टी मिळाल्यावर घरी परतताना सावकाराकडून ते पैसे परत घेऊन जात असत.

एका सैनिकाची गोष्ट महाराजजी सांगत असत. त्यावेळी सीमाप्रांतामध्ये पठाण लोक बंडखोरी करीत होते. तो सैनिक ज्या घोडीवर बसलेला होता, ती घोडी शत्रुच्या क्षेत्रात गेली. शत्रुंनी त्या घोडीवर अनेक गोळ्या झाडल्या. त्या सैनिकासही गोळी लागली. त्या दोघांचाही मृत्यु झाला. सरकारी नियमा नुसार मृत सैनिकाचे जे काही देणे बाकी असेल, ते त्याच्या वारसास दिले जाते. सरकारकडे जे काही देणे होते, ते तर दिले गेले, परंतु सावकाराकडे

अडीच हजार रुपये त्या सैनिकाचे जमा होते, जे लोभवशात त्याने सैनिकाच्या वारसास देण्याचे टाळले. तो सावकार सहारनपुरचा रहिवाशी होता.

कालांतराने त्या सैनिकाने सावकाराच्या घरी त्याचा मुलगा म्हणून जन्म घेतला. त्याने तारुण्यावस्थेत प्रवेश केला असता, त्याचा विवाह केला गेला. परंतु विवाहानंतर तो आजारी पडू लागला. त्या सावकाराकडे अमाप धनसंपत्ती असल्याने, त्याने त्या मुलाच्या उपचारासाठी नामांकीत डॉक्टरांना बोलाविले, खूप खर्च केला, परंतु तो मुलगा काही बरा झाला नाही. सर्व बाजूंनी प्रयत्न करूनही अपयश मिळाल्यावर त्या दु:खी माणसास नगण्य गोष्टीदेखील महत्त्वाच्या वाटू लागतात. सावकाराने विचार केला! आपल्या मुलाचा मंतरलेले धागे–ताईत देणाऱ्या मांत्रिकाद्वारे उपचार करावा. कदाचित! या लोकांच्या आशीर्वादाचा तरी मुलास फायदा होईल.

त्या शहराबाहेर एक मौलवी राहात असे. त्या मौलवीकडे जाऊन सावकार म्हणाला, ''मला एकुलता एक मुलगा असून त्याचा नुकताच विवाह झाला आहे. त्याच्या आजारपणावर मी आतापर्यंत खूप उपचार केले, परंतु तो बरा झाला नाही. आपण जर त्यास काही औषधी वनस्पती वगैरे देऊन त्याचा काही उपचार केल्यास मी तुमचा अत्यंत आभारी राहीन.'' मौलवीने उत्तर दिले की,''मी तुझ्या घरी येऊन, तुझ्या मुलावर तंत्र–मंत्राने इलाज करतो, ज्यामुळे त्यास बरे वाटेल.''

मौलवीने सावकाराच्या घरी येऊन त्या मुलावर तंत्र–मंत्राने उपचार केला असता, तो मुलगा काहीसा शुद्धीत आला. मुलाने नेत्र उघडलेले पाहून सावकारास अत्यंत आनंद झाला. मौलवीस भरपूर पैसे देऊन खूष करावे अशा विचाराने सावकाराने खिशात हात घातला, त्यावेळी त्याच्या खिशात केवळ अडीच रुपयेच सापडले. ते अडीच रुपये मौलवीस देत सावकार म्हणाला की, माझ्या खिशात नेहमी बरेच पैसे असतात. परंतु यावेळी केवळ अडीच रुपये आहेत, ते तुम्ही स्विकारा. सायंकाळी मी तुम्हास आणखीन पैसे देऊन खूष करीन. मौलवी सावकारास म्हणाला माझ्या एकदाच केलेल्या

तंत्र–मंत्रामुळे तुझ्या मुलाचा चेहरा किती खुलला आहे. सायंकाळी येऊन पुन्हा तंत्र–मंत्राचा वापर करून उपचार केल्यावर हा पूर्णपणे बरा होईल.

मौलवी जेव्हा घराबाहेर पडला, तेव्हा सावकाराने मुलास विचारले, ''मुला! तुला आता बरे वाटत आहे ना?'' मुलाने सावकारास विचारले, ''मी कोण आहे हे तुम्ही ओळखले काय? ज्या सैनिकाचे तुमच्याकडे अडीच हजार रुपये जमा होते, तोच सैनिक मी आहे. तुम्ही आतापर्यंत माझ्यावर उपचारासाठी केलेल्या खर्चाचा हिशोब करून पाहा, त्यातील अडीच रुपये बाकी होते, ते मी तुमच्याद्वारे त्या मौलवीस देवविले आहेत. माझा विवाह ज्या मुलीशी झाला आहे, ती मुलगी पूर्वजन्मी तीच घोडी होती जिने मला शत्रूच्या क्षेत्रात नेऊन माझ्या मृत्युचे कारण बनली होती. माझा तुमच्याशी बाकी असलेला हिशोब पूर्ण करून मी आता चाललो आहे. या घोडीसाठी हीच शिक्षा आहे की आयुष्यभर हुंदके देत ती रडत राहील.''

महाराजजी सांगत असत की, ते हरिद्वारहून परत येत असताना वाटेत त्यांना तो सावकार भेटला. महाराजजी सैन्यात असल्यापासून त्यांचा त्या सावकाराशी परिचय होता. सावकार महाराजजींना आपल्या घरी घेऊन गेला व रात्री मुक्कामी त्याच्या घरीच राहाण्याचा त्यांना आग्रह केला. त्या सावकाराच्या मुलाने सावकारास जर सत्य कथन केले नसते,तर तो सावकार रडत–विलाप करीत राहिला असता. परंतु सत्याची जाणीव झाल्यानंतर त्याने कोणासाठी रडावे? लोक आपापसामध्ये चर्चा करीत होते की याच्या तरुण मुलाचा मृत्यू होऊन सून विधवा झाली आहे, असे असूनही हा रडत नाही, किती कठोर हृदयाचा हा मनुष्य आहे?

सावकारास हे सर्व माहिती होते म्हणून तो शांत होता. संध्याकाळी जेव्हा सुग्रास अन्न बनवून जेवण्यासाठी वाढले गेले, तेव्हा सावकाराची पत्नी देखील रडू लागली की आपल्या तरुण मुलाचा मृत्यु होऊनही या मनुष्याच्या हृदयास थोडेदेखील दु:ख वाटत नाही. सावकाराची सूनही रडू लागली की माझ्या पतीचा मृत्यु झाला असूनही यास मात्र सुग्रास अन्नाची काळजी आहे.

महाराजांसमोर जेवण्यासाठी अन्न वाढले असता त्या बायकांचा रडण्याचा आवाज ऐकून महाराजजींनी विचारले, ''हा कोणाच्या रडण्याचा आवाज येत आहे?'' सावकार म्हणाला, ''तुम्ही भोजन करा, त्या आवाजाकडे दुर्लक्ष करा.'' महाराज म्हणाले,''तू सत्य मला सांगितले, तरच मी भोजन करीन.''

सावकाराने सर्व गोष्ट महाराजजींना सांगितली की,''सैनिकास घोडीने कशा रितीने ठार करविले होते. मी मोहाच्या आहारी जाऊन त्या सैनिकाचे अडीच हजार रुपये दडपून ठेवले होते. त्या सैनिकाने माझ्या घरी मुलाच्या रूपाने जन्म घेतला व त्याच्या अडीच हजार रुपयांची वसुली करून तो मृत्यू पावला आहे. मरता-मरता त्याने मला सांगितले की, मी तुझा मुलगा नसून, तो सैनिक आहे. माझ्या कर्जाची वसुली करण्यासाठी येथे आलो होतो, ती वसुली पूर्ण झाली आहे. माझी हत्या होण्यास कारण असलेली घोडी, ही माझी पत्नी असून, आयुष्यभर रडत राहणे हीच तिच्यासाठी शिक्षा आहे. हे महात्मा! आता आपणच मला सांगावे की मृत्यु झाला सैनिकाचा व त्यासाठी हुंदके देत आहे घोडी, तर मग मी कोणासाठी व का रडू? महाराजजी ही घटना अनेकदा सत्संगात सांगत असत.

बंधुनो! प्रेमीने विचारलेला प्रश्न सर्वांसाठीच उपयोगी होता. आणखीन बरेच काही यावर सांगितले जाऊ शकते परंतु वेळ झालेला आहे. सर्वात उत्तम हेच आहे की आपण आपले या जगात विखुरलेले लक्ष नामस्मरणाद्वारे आपल्या तिसऱ्या तिळावर एकाग्र करीत अंतर्यात प्रवेश करावा. कारण तेथे गेल्यानंतरच एखादी घटना का घडली याचा आपणांस उलघडा होतो आणि कोणत्या कर्मांची परतफेड करीत आहोत याचे आपणांस ज्ञान होते.

शारीरिक संतुलन राखण्यासाठी सर्व संत स्वत:ही औषध-पाणी घेतात. तसेच आपणांसदेखील सल्ला देतात की, हातावर हात ठेवून शांत बसून राहण्याऐवजी आपण स्वत:वर औषधोपचार जरूर करावा, जेणेकरून आपल्या पूर्वकर्मांची परतफेड व्हावी व थोडेफार सुखी जीवन जगत आपली प्रकृती देखील उत्तम राहावी.

***